**सं. फौ. खटला क्र. ५४६/२०२१**
**निशाणी क्रमांक :–**

**कर्जत येथील एस. एन. थापेकर, न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग कर्जत, यांचे न्यायालयात.**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अपराध घडल्याचा दिनांक | : | १५.०२.२०२१ |
| २. | फिर्याद दाखल दिनांक | : | ०८.०६.२०२१ |
| ३. | फिर्यादीचे नांव वय व पत्ता | : | त्रिमुर्ती ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्यादित कुळधरण, शाखा कर्जत, ता.कर्जत, जि.अहमदनगर करीता क्लार्क **श्री. राजेंद्र किसन खोडवे,** वय : ३४, व्यवसाय : नोकरी. मु.पो. धालवडी, ता.कर्जत, जि.अहमदनगर. |
| ४. | आरोपीचे नांव, वय व पत्ता | : | **श्री. शिवाजी हरिभाऊ घालमे**, वय : ६०, व्यवसाय : शेती, मु.पो.शिंदा, ता.कर्जत, जि.अहमदनगर. |

५. अपराधाचा तपशिल :–

तू फिर्यादी संस्थेकडून दि.०५.०७.२०१९ रोजी संकरीत गायी खरेदीसाठी घेतलेले कर्ज रक्कम रुपये २,००,०००/– चे हप्ते व व्याजासह थकित असलेली रक्कम रुपये २,७९,०६७/– ची फिर्यादीने तुझ्याकडे मागणी केली असता तू तुझे खाते असलेले दि अहमदनगर डिस्ट्रीक्ट सेंट्रल को.ऑप. बँक लि., शाखा

बिटकेवाडी, ता.कर्जत, जि.अहमदनगर वरील धनादेश क्र.००२२२१ रक्कम रुपये २,७९,०६७/– दि. ०९/०२/२०२१ तुझ्या सहीनिशी दिलेला धनादेश फिर्यादीने त्याचे खाते असलेल्या दि अहमदनगर डिस्ट्रीक्ट सेंट्रल को–ऑप बँक लि. शाखा बिटकेवाडी, ता.कर्जत, जि. अहमदनगर दि.१५.०२.२०२१ रोजी वटण्यास टाकला असता, सदरचा धनादेश दि.१५.०२.२०२१ रोजी 'funds insufficient' या कारणास्तव न वटता परत आला. त्यानंतर फिर्यादीने त्यांच्या विधीज्ञामार्फत तुला दि.०३.०३.२०२१ रोजी पाठविलेली नोटीस तुला दि.०८.०३.२०२१ रोजी मिळून देखील तू सदर नोटीस मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत धनादेशाची रक्कम फिर्यादीस दिलेली नाही म्हणून तु परक्राम्य संलेख अधिनियम १८८१ चे कलम १३८ प्रमाणे दंडनिय अपराध केला अशी गुन्ह्याची तोहमत तुझ्यावर ठेवण्यात आलेली आहे.

येणे प्रमाणे गुन्ह्याचा तपशिल.

SHIVAJI N THAPEKAR Digitally signed by SHIVAJI N THAPEKAR Date: 2025.12.15 16:13:27 +0530

दिनांक : १५.१२.२०२५ **(एस. एन. थापेकर)**

ठिकाण : कर्जत न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, न्यायालय क्र.१,

कर्जत.

**प्रमाणपत्र**

वरील गुन्ह्याचा तपशिल आरोपीस मराठीमध्ये वाचून व समजावून सांगितला. आरोपीचे निवेदन स्वतंत्रपणे नोंदविले आहे.

SHIVAJI N THAPEKAR Digitally signed by SHIVAJI N THAPEKAR Date: 2025.12.15 16:13:32 +0530

दिनांक : १५.१२.२०२५ **(एस. एन. थापेकर)**

ठिकाण : कर्जत न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, न्यायालय क्र.१,

कर्जत.